वादीतर्फे साक्षीदार क्र.१

नि.दि.दा क्र.१७१/२०१५
पुर्णाबाई विरूध्द चंद्रभान
निशाणी १३ च्या मागे

**उलटतपास शपथेवर सुरु प्रतिवादी तर्फे वकील श्री. डि.सी. चंहादे यांच्या मार्फत**

हे म्हणणे खरे आहे की सदरचा दावा सन २००१ मध्ये दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकतीचे वर्णन दावा दाखल करतांना जे होते तसे आज नाही. हे म्हणणे खरे नाही की दावा मिळकती संदर्भाती अदयावत सातबारा पत्रके, गाव नमुना -८ व फेरफार याकामी दाखल केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की या दाव्यातील आता मलादाखविण्यात आलेले दिनांक १०.१०१९८० चे हक्क सोडपत्र रद्द बादल करून मिळण्याबाबत मी कोणत्याही न्यायालयात दावा दाखल केला नाही. हे म्हणणे खरे नाही की त्यामुळे दिनांक १०.१०.१९८० चा हक्क सोडपत्राचा लेख अबाधित आहे. हे म्हणणे खरे नाही की सर्व्हे क्रमांक २१५/२, आराजी २.१९ आर ही मिळकत फेरफार क्र.६२ दिनांक ०९.०६.१९८७ अन्वये प्रतिवादी क्र.१ चे नावे महसुल दफ्तरी नोंद झाली. मी फेरफार क्र.६२ दिनांक ०९.०६.१९८७ विरूध्द वरिष्ठ महसुली अधिकारी कडे आजपर्यंत अपील केले नाही.

हे म्हणणे खरे नाही की सर्व्हे क्र.२१५/३ या मिळकतीला प्रतिवादी क्र.२ याचे नाव दिनांक १०.१०.१९८० च्या हक्क सोडपत्राद्वारे नोंद झाले आहे. मी प्रतिवादी क्र.२ चे नावाची नोंद ज्या फेरफार क्र.६२ दिनांक ०९.०६.१९८७ रोजी झाली तो फेरफार आजपर्यंत आव्हाणित केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की सर्व्हे क्र.४७ मधील आराजी १४.४५ आर वरील हक्क झिबलाबाई व पुर्णाबाई यांनी सोडून दिला होता. हे म्हणणे खरे नाही की झिबलाबाई व पुर्णाबाई यांना सर्व्हे क्र.४७ मध्ये कोणताही हक्क राहिलेला नव्हता.

हे म्हणणे खरे नाही की जुना सर्व्हे क्र.१०२-अ व १०२-ब या मिळकती वादी व प्रतिवादींच्या वडिलार्जित मिळकती आहेत. हे म्हणणे खरे नाही की सर्व्हे क्र.१. २-अ व १०२-ब या मिळकती मधील हक्क पुर्णाबाई व झिबलाबाई यांनी सोडल्यामुळे त्यांचा या मिळकती मध्ये हक्क नाही. पुर्णाबाईचे वय ७५ वर्ष सध्या आहे. पुर्णाबाईचे लग्न सन १९९४ पूर्वी झाले आहे अगर कसे ते मला सांगता येणार नाही. हे म्हणणे

खरे नाही की सर्व्हे क्र.२१५/२ व २१५/३ याचे सातबारा प्रतिवादी क्र.१ व २ यांचे नावे झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की सर्व्हे क्र.२१५/२ व २१५/३ या मिळकती मी अगर माझी आई वाहत नाही व या मिळकती प्रतिवादी क्र.१ व २ वाहत आहे. हे म्हणणे खरे नाही की माझे आईला तिच्या भावाच्या मिळकती मध्ये हक्क मागण्याचा अधिकार नाही. हे म्हणणे खरे आहे की सर्व्हे क्र.२१५/अ/१ आराजी १.६२ आर या मिळकतीला माझी आई व प्रतिवादीच्या नावाची नोंद आहे. हे म्हणणे खरे नाही की सर्व्हे क्र.२१५/अ/१ या मिळकतीला माझे आईच्या नावाची झालेली नोंद चुकीने झालेली आहे. हे म्हणणे खरे नाही की सर्व्हे क्र.४७/१ आराजी १.६२ आर या मिळकतीला झिबलाबाईची झालेली नोंद चुकीची आहे कारण तिने आपले हक्क दिनांक १०.१०१९८० च्या हक्क सोडपत्र लेखाने सोडले होते. हे म्हणणे खरे नाही की झिबलाबाई व पुर्णाबाई यांनी दावा मिळकती मधील त्यांचे हक्क सोडले आहे व त्यामुळे त्यांना दावा मिळकती मध्ये कोणतेही हक्क प्राप्त होत नाही व त्या दावा मिळकतीच्या मालक नाहीत.

हे म्हणणे खरे आहे की निशाणी २१ ते २३ मध्ये पुर्णाबाईचे नाव नाही. हे म्हणणे खरे नाही की दावा मुदत बाहय आहे. मी निशाणी २१ ते २३ मध्ये पुर्णाबाईचे नाव कमी झालेले दिसते त्याची नोंद आव्हाणित केलेली आहे व ते अपील प्रलंबित आहे. परंतु त्याची कागदपत्रे मी याकामी दाखल केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की निशाणी २४ व २५ कडील नोटीस द्वारे पुर्णाबाईन वाटणी मागितली होती. हे म्हणणे खरे नाही की निशाणी २४ व २५ कडील नोटीस मुदतबाहय असल्याने सदरचा दावा देखील मुदतबाहय आहे. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे व खोटा दावा केला आहे.

**उलटतपास पुर्ण**

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष,

**स्वाक्षरी/-**
(अमित अ. कुलकर्णी)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर
कामठी

कामठी
दिनांक : १८/०३/२०२३